**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०१**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- १७/४/२०१

प्रति,
मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. ०१ बुधवार दि.२१/०४/२०१० रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**बुधवार दिनांक- २१/०४ /२०१० ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| १ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक १० बुधवार दिनांक ३१/०३/२०१० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे |
| २ | मा. केंद्र शासीत यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ राबविणे कामी प्राप्त निविदा दराचा तक्ता मा. स्थायी समितीच्या निर्णयास्तव सादर. |
| ३ | अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचा जलतरण तलाव ५ वर्ष कालावधीसाठी चालविण्यांस देणे व त्या काळात जलतरण तलावाची देखभाल व दुरूस्ती पहाणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक १० बुधवार दिनांक ३१/०३/२०१० रोजीच्या इतिवृत्ताची प्रत व विषय-क्रमांक २ ते ३ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिति सभा क्रमांक :-१**

विषय क्रमांक- १ बुधवार दिनांक २१/०४/२०१०

ठराव क्रमांक - १ बुधवार दिनांक २१/०४/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिति सभा क्रमांक १० बुधवार दिनांक ३१/०३/२०१० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिति सभा क्रमांक १० बुधवार दिनांक ३१/०३/२०१०रोजी झालेल्या मा.स्थायी समिति सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिति पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिति सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा दिनांक ३१/०३/२०१० रोजीचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणे आहे. मा. सदस्यांनी आपल्या सुचना दुरूस्त्या सांगाव्यात.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- मा. सभापती साहेब मागिल सभा दिनांक ३१/०३/२०१० ठराव क्रमांक १११अन्वये मा.शासन निर्णयानुसार आपले अहमदनगर महानगरपालिकेचे आस्थापना कायम सुचीवरील आवश्यक पदांचे पद निर्मित्तीचे प्रस्तावास मंजूरी देण्यांत आलेली आहे. प्रशासनाने सुचविलेल्या आवश्यक दहा पदापैकी फक्त सात पदांचे पदनिर्मितीस मा.सभेने मंजूरी दिलेली आहे. पंरतु सदर पदा प्रमाणेच आवश्यक असलेल्या मुल्य निर्धारक करसंकलन अधिकारी व सहाय्यक मुल्य निर्धारक करसंकलन अधिकारी या दोन ही पदांचे पदनिर्मित्तीचे प्रस्तावास मंजूरी देण्यांत आलेली नाही. गेल्या वर्षी आपण मालमत्ता कर वसुली मोहिम कडक करून ४०% पर्यत थकबाकी वसुलीची कार्यवाही केलेली असून आगामी काळात ही मालमत्ता कराची कर वसुली आपण मोठया प्रमाणात करणार आहोत म.न.पा. मधील अनुभवी कर्मचारी सेवानिवृत्त होत असल्याने महानगरपालिकेकरिता आवश्यक असलेली ही दोन्हीही महत्वाची पदे भरणे आवश्यक आहे. मुल्य निर्धारक करसंकलन अधिकारी हे वर्ग एक चे पद व सहाय्यक मुल्य निर्धारक करसंकलन अधिकारी या दोन ही पदाचे पदनिर्मित्तीचे प्रस्तावास मा.सभेने मंजूरी द्यावी.

मा.उपायुक्त(कर) डॅा.श्री.जावळे साहेब :- मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी व सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलनअधिकारी या दोन ही पदांची आपले महानगरपालिके करिता आवश्यकता आहे. महानगरपालिका हददीतील मालमत्ता कराची रिव्हीजन ही लवकरच होणार असलेने मालमत्ता कर, जाहिरात कर, जकात, उपकर, इत्यादी उत्पन्नाच्या बाजू पहाणे करिता त्या बळकट करणे करिता सदर पदांची आवश्यकता आहे.या दोन ही पदांचे पदनिर्मित्तीस मा.सभेने मंजूरी द्यावी.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी , सहाय्यक मुल्य निर्धारक करसंकलन अधिकारी या दोन पदाचे पदनिमित्तीस मा. सभेने मंजूरी द्यावी. तसेच कार्यकारी अभियंता या दोन पदापैकी एक बांधकाम विभागाकरिता व एक पाणी पुरवठा विभागाकरिता याप्रमाणे वर्गवारी करणेत यावी. त्यास मा.सभेने मंजूरी द्यावी.

मा.सभापती साहेब :- कार्यकारी अभियंता पदे पदोन्नतीने भरण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री.पवार बा.रे. :-आपले महानगरपालिकाकरिता आवश्यक असलेल्या मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी व सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी या पदांचे पदनिर्मित्तीचे प्रस्तावास व कार्यकारी अभियंता या दोन पदापैकी एक बांधकम विभाग व एक पाणी पुरवठा विभागाकरिता याप्रमाणे दुरूस्ती सह मागिल सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- दुरूस्ती सह मागिल सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांत मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- आपले महानगरपालिके करिता आवश्यक असलेल्या मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी व सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी या पदांचे पदानिर्मितीचे प्रस्तावास मंजूरी देण्यांत यावी. व कार्यकारी अभियंता या दोन पदापैकी एक बांधकाम विभाग व एक पाणी पुरवठा विभागकरिता याप्रमाणे पदे पदोन्नतीने भरण्यांत यावेत. या दुरूस्तीसह मागिल सभेचे कार्यवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>**मा.स्थायी समिती सभा क्रमांक १० बुधवार दिनांक ३१/०३/२०१० रोजीचे सभेमध्ये ठराव क्रमांक १११ नुसार पारित केलेल्या ठरावामध्ये

| अ.नं. | पदांचे नांव | पदसंख्या | वेतनश्रेणी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | २ | १०६५०-१५५०० | एक बांधकाम विभाग करिता व एक पाणी पुरवठा विभागाकरिता (पदोन्नतीने) |
| २ | मुल्य निर्धारक करसंकलन अधिकारी | १ | ८०००-१३५०० | --- |
| ३ | सहाय्यक मुल्य निर्धारक करसंकलन अधिकारी | १ | ६५००-१०५०० | --- |

याप्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचे आस्थापना कायम सुचीवरील पदनिर्मिती करणेस मान्यता देणेत येत आहे.

याप्रमाणे दुरूस्ती करणेस मंजूरी देण्यात येत आहे. वरील प्रमाणे चे दुरूस्तीसह मा.स्थायी समिती सभा क्रमांक १० बुधवार दिनांक ३१/०३/२०१० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. बाळासाहेब रेवजी पवार

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१**

विषय क्रमांक-२ बुधवार दिनांक २१/०४/२०१०

ठराव क्रमांक -२ बुधवार दिनांक २१/०४/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** मा.केंद्र शासीत यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ राबविणे कामी प्राप्त निविदा दराचा तक्ता मा. स्थायी समितीच्या निर्णयास्तव सादर.

**प्रस्तावाचा मजकूर :-**अ.नगर म.न.पा. शहर पाणी पुरवठा विभाग /जा.क्र.६५ दि.१७/४/२०१०

विषय :- UIDSSMT योजनेअंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ कामासाठी प्राप्त झालेले निविदा दर मा. स्थायी समितीच्या निर्णयास्तव सादर करणे बाबत.

संदर्भ **:-** १) मे. तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट यांची दि.१८/२/२०१० रोजीची प्राप्त कमीची निविदा

२) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. पुणे यांचे पत्र क्र AMC / WSS /०९-१०/२२ दि. १५/३/२०१०

३) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. पुणे यांचे पत्र क्र AMC / WSS /०९-१०/२३ दि. २०/३/२०१०

४) मे. तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट यांचे दि.३१/३/२०१० चे पत्र प्राप्त दि.१/४/२०१०

५) मे. तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट यांचे दि.१५/४/२०१० चे पत्र

६) मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे यांचे पत्र क्र.१२६४ दि.९/४/२०१०

७) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. पुणे यांचे पत्र क्र. AMC / WSS /०९-१०- कँप, अहमदनगर दि.१५/४/२०१०

८) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. पुणे यांचे पत्र क्र. AMC / WSS /०९-१०/२४ दि. १६/४/२०१०

**टिप्पणी**

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट की, मा. केंद्र शासनाच्या UIDSSMT या योजनेअंतर्गत मंजूरी मिळालेल्या अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ या कामासाठी दि.२८/१/२०१० रोजीचे दैनिक लोकमत तसेच इंडियन एक्सप्रेस या वर्तमानपत्रात फेर जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

निविदा सादर करणेचा दि.१८/२/२०१० रोजी विषयांकित कामासाठी विहीत मुदतीत व वेळेत खालील निविदाधारकांनी निविदा सादर केल्या होत्या.

१] एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. ठाणे

२] ए.सी. कोठारी, अहमदनगर

३] तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट लि. मुंबई

वरील कामासाठी विहीत मुदतीत व वेळेत प्राप्त झालेल्या निविदा दि.९/०३/२०१० रोजी दुपारी १.०० वाजता मा.उपायुक्त यांचे दालनात मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. पुणे कडील श्री. पाटे, श्री. बागुल तसेच मा. उपायुक्त (कर), मुख्यलेखाधिकारी, मुख्यलेखापरिक्षक, पाणीपुरवठा विभाग प्रमुख, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, पाणी पुरवठा विभाग तसेच उपस्थित ठेकेदार व प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचे तुलनात्मक दराच्या तक्ता पाहता मे. तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट लि. मुंबई यांचे दर स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमीचे म्हणजेच ७२% जादाचे आलेले होते.

प्राप्त निविदेचा तुलनात्मक अभ्यास करणेकामी या योजनेसाठी नेमण्यात आलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांचेकडे निविदा पाठविण्यात आली असता त्यांनी संदर्भिय पत्र क्र. २ व ३ नुसार अभिप्राय इकडेस सादर केले होते.(सोबत- पत्र) परंतु यातील किंमती अवास्तव असल्याने म.न.पा.च्या पा.पु. विभागामार्फतही निविदेची पडताळणी करण्यात आली.

यानुसार मे. तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट लि. मुंबई यांचे दर स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमीचे परंतु चालू दरसुचीची तुलना करता जादाचे असल्याने संबंधीत ठेकेदार यांना दर कमी करणेच्या दृष्टीने वाटाघाटी करणेकामी इकडील पत्र क्र. पा.पु. १५०२ दि.२६/३/२०१० देवून दि.२९/३/२०१० उपस्थित राहणे संबंधीत कळविण्यात होते. परंतु दि.२९/३/२०१० रोजी संबंधीत एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित न राहता एजन्सीने मुदतवाढ मिळणे बाबत फॅक्सद्वारे पत्र इकडेस दिले होते. त्यांचे विनंतीवरून त्यांना दि.१/४/२०१० रोजी वाटाघाटीसाठी मा.आयुक्त यांचे दालनात उपस्थित राहणे विषयी कळविण्यांत आले होते.

याअनुषंगाने दि.१/४/२०१० रोजी मा. आयुक्त साहेब यांचे दालनात मा.उपायुक्त (सा.), पाणी पुरवठा विभाग प्रमुख, उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे प्रतिनिधी, श्री. पाटे व श्री. बागूल तसेच कमीचे निविदाधारक तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट करिता प्रतिनिधी श्री. अग्रवाल व श्री. बाफना यांचे उपस्थितीत वाटाघाटी करण्यात आल्या.

सदरच्या वाटाघाटीच्या बैठकीत कमीचे निविदाकार मे. तापी प्रिस्टेस प्रोडक्ट प्रा.लि. यांनी त्यांचे मुळ देकारात ३% च कपात करित असल्या बाबत सांगितले. यानुसार वाटाघाटीनंतर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६९% जादाचे दराने काम करणेस तयार असल्याचे लेखी स्वरूपात सहमती दर्शविली होती. त्यानुसार खालील प्रमाणे निविदेच्या किंमती येत आहेत.

**अ)**

| | | |
|---|---|---|
| १) निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम | | रू. ७०,२४,१५,७१६/- |
| २) सुरूवातीच्या देकार ७२% नुसार जादा रक्कम | | रू. ५०,५७,३९,३१५/- |
| | | ................................ |
| | एकूण | रू. १२०,८१,५५,०३१/- |

**ब)**

| | | |
|---|---|---|
| १) निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम | | रू. ७०,२४,१५,७१६/- |
| २) वाटाघाटीनंतरचा देकार ६९% जादा | | रू. ४८,४६,६६,८४४/- |
| | | ................................ |
| | एकूण | **रू. ११८,७०,८२,५६०/-** |

या वाटाघाटीनंतरचा प्राप्त देकारही जादाचा असल्याने, तसेच या योजनेच्या प्रकल्प अहवालाचे सन २००९-२०१० चे दरसुचीनुसार फेरमुल्यांकन करणेचे काम मा. मुख्य अभियंता, म.जी. प्रा.पुणे यांचे कार्यालयामार्फत चालू असून हे मुल्यांकन होवून प्रकल्प अहवालाची किंमत अंतीम झालेनंतरच या देकाराबाबत अंतीम निर्णय घेणे योग्य राहिल असे ठरले.

दि. ९/४/२०१० रोजी मा. मुख्य अभियंता म.जी. प्रा. पुणे यांचेकडून प्रकल्प अहवालाची फेर मुल्यांकनाची किंमत अंतीम करण्यात आली असून त्यानूसारचे पत्र इकडेस दि. १३/४/२०१० रोजी प्राप्त झालेले आहे.

मा. मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे यांनी फेरमुल्यांकन करताना १) पंपीग मशिनरी व २) SCADA याबाबतचे मुल्यांकन अनुक्रमे

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १) पंपीग मशिनरी | - | १८,६७,३५,७९५/- | + | १,३९,४९,०००/- | = | २०,०६,८४,७९४/- |
| २) SCADA | - | ३,०४,००,०००/- | + | ४,८४,००,०००/- | = | ७,८८,००,०००/- |

दिलेले असून यासह योजनेच्या प्रकल्प अहवालाची फेर मुल्यांकन किंमत ३% Contengensis सह रू. १०६,२७,८२,४७८/- इतकी प्रमाणीत केलेली आहे.

त्याचप्रमाणे निविदेबाबतचे मुल्यांकन योजनेचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. पुणे यांचेकडूनही पुन्हा करण्यात आले. (यापूर्वी या संदर्भात त्यांनी दोन वेळेस मुल्यांकन अहवालही दिलेला आहे.) दि.१५/४/२०१० रोजी मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. पुणे यांनी वरील संदर्भ पत्र क्र.७ अन्वये निविदा बाबत पूर्न मुल्यांकन सादर केले असून मुल्यांकनाची एकूण किंमत रू.१०७,०४,६१,५७९/- इतकी येत असल्याबाबत नमूद करून सविस्तर अहवाल दिला आहे. (सोबत अहवाल जोडला आहे)

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. पुणे यांनी सादर केलेल्या वरील रक्कमेची (रू. १०७,०४,६१,५७९/-) वाटाघाटीनंतर प्राप्त (रू.११८,७०,८२,५६०/-) रक्कमेशी तुलना केली असता वाटाघाटीनंतरची निविदा रक्कम १०.८९% इतकी जादा येत आहे.

परंतु प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी तुलना करताना पंपीग मशिनरी करिता रू.१९,४८,९५,८१०/- इतकी तरतुद धरलेली आहे. परंतु मा. मुख्य अभियंता म.जी.प्रा. पुणे यांनी प्रकल्पाचे फेरमुल्यांकन करताना पंपीग मशिनरी करिताची रक्कम, विम्याची रक्कम सोडून रू.१७,९५,५३,६४९/- इतकी प्रमाणीत केलेली आहे. त्यामुळे मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे यांनी प्रमाणीत केलेली रक्कमच निविदेची तुलना करताना धरणे योग्य वाटत असल्याने वरील तफावतीमुळे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामार्फतही निविदेची तुलना करण्यात आली असून यात पंपीग मशिनरी व SCADA या बाबतच्या रक्कमा मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे यांनी प्रमाणीत केलेल्या धरण्यात आल्या असून इतर बाबी चालू दरसुचीनुसार धरण्यात आलेल्या आहेत. यानुसार चालू दरसुचीप्रमाणे (सन २००९-२०१०) निविदेची मुल्यांकनाची किंमत रू.१०५,६०,९१,७६२/- इतकी येत आहे. (सोबत सविस्तर प्रपत्र जोडले आहे.)

महानगरपालिकेने वरीलप्रमाणे मुल्यांकन केलेल्या किंमतीची (१०५,६०,९१,७६२/-) तुलना वाटाघाटीनंतरच्या प्राप्त रक्कमेशी (रू. ११८,७०,८२,५६०/-) केली असता वाटाघाटीनंतरची रक्कम १२.४०% इतकी जादा येत आहे.

वाटाघाटीनंतरची प्राप्त निविदेची रक्कम जादाची असल्याने दर कमी करणेच्या दृष्टीकोनातून, कमीच्या निविदाधारकाशी पुनश्च वाटाघाटी मा.आयुक्त, मा.उपायुक्त, पाणी पुरवठा विभाग प्रमुख, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.स्ट्रडकॉम कन्सलटंट यांचे प्रतिनिधी श्री. बागूल यांचे समक्ष मा.आयुक्त दालनात वाटाघाटी करण्यात आल्या.

सदरच्या वाटाघाटीत कमीचे निविदाकार मे. तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट लि. **JV** यांचे प्रतिनिधी श्री. अग्रवाल यांनी त्यांनी दिलेला देकार निविदेच्या अंदाजीत रक्कमेपेक्षा ७२% वरून ६५.२५ % इतका कमी करत असले बाबत सांगितले व त्यानुसार लेखी पत्र दिले.
त्यानुसार दुस-या वाटाघाटीनंतर प्राप्त दर पुढीलप्रमाणे येत आहेत.

**अ)**

| | | |
|---|---|---|
| १) निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम | | रू. ७०,२४,१५,७१६/- |
| २) सुरूवातीच्या देकार ७२% नुसार जादा रक्कम | | रू. ५०,५७,३९,३१५/- |
| | | ................................. |
| | एकूण | रू. १२०,८१,५५,०३१/- |

**क)**

| | | |
|---|---|---|
| १) निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम | | रू. ७०,२४,१५,७१६/- |
| २) दुस-या वाटाघाटीनंतरचा देकार ६५.२५% जादा | | रू. ४५,८३,२६,२५४/- |
| | | ................................. |
| | एकूण | **रू. ११६,०७,४१,९७०/-** |

दुस-या वाटाघाटीनंतरच्या प्राप्त रक्कमेची (रू. ११६,०७,४१,९७०/-) तुलना या योजनेचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी दि.१५/४/२०१० रोजी सादर केलेल्या निविदा मुल्यांकन रक्कमेशी (रू.१०७,०४,६१,५७९/-) केली असता दुस-या वाटाघाटीनंतरची प्राप्त निविदा ८.४३% जादाची येत आहे. त्याचप्रमाणे पा.पु. विभागामार्फत केलेल्या मुल्यांकनाच्या (रू. १०५,६०,९१,७६२/-) रक्कमेशी तुलना करता ९.९१% इतकी जादा दराची येत आहे.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व म.न.पा. मार्फत करण्यात आलेल्या मुल्यांकना पेक्षा दुस-या वाटाघाटीनंतरचे दर जादा येत असल्याने याबाबत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचा अभिप्राय घेतला असता त्यांनी या योजनेचा कालावधी ३ वर्षाचा असून योजनेत Price Escalation या कलमाचा अंतर्भाव नसल्याने तसेच पहिल्या निविदेस मिळालेला अल्प प्रतिसाद पाहता दुस-या वाटाघाटीनंतरचे कमीचे निविदाधारकाचे दर रू. ११६,०७,४१,९७०/- स्विकारण्यास हरकत नसल्याचे लेखी पत्राद्वारे कळविले आहे.

तथापी निविदा स्विकृतीचा निर्णय मा.स्थायी समिती पुढे सादर करण्यात यावा. असे अभिप्राय अ.ले.प., मु.ले.प. / मु.ले.अ., मा.उपायुक्त , मा.आयुक्त यांनी दिलेले आहेत.

करिता संपूर्ण प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे दि.१७/४/२०१०
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मा. केंद्र शासनाचे यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ राबविणे कामी आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. लोंढे शि.बा. :- सदरचे अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ चे निविदे संदर्भात माझे काही प्रश्न आहेत. त्या बध्दल माहिती देण्यात यावी. सदर निविदे संबंधीचे रेट ॲनलिसीस केलेले आहे का?

मॅके. इंजि.श्री. निकम पी.जे. :- दराची तुलना पडताळणी करूनच प्रस्ताव मा.सभे पुढे मंजूरी साठी सादर केलेला आहे.

मा.श्री. लोंढे शि.बा. :- आपणास जास्तीत जास्त किती जादाचे टक्के वारीपर्यत निविदा दरास मंजूरी देता येईल. फेर मुल्याकंनाचे फरका बध्दल माहिती द्यावी.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- या पूर्वीच्या काही कामांना १० % पर्यत जादाचे निविदा दरास मंजूरी दिलेली आहे. मा. केंद्र शासनाचे यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा फेज-२ या योजनेची सन २००७-२००८ चे दर सुचीनुसार अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रूपये ७३.०५ कोटी होती सन २००९-२०१०चे दर सुची नुसार सदर योजनेचे मुल्यांकन रूपये १०६,२७,८२,४७८/- इतके होते. तसेच सदर योजनेचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.स्ट्रडकॉम कंन्सलटंट प्रा.लि. पुणे यांनी ही आलेले निविदा दराची सन २००९-२०१० चे डी.एस.आर. रेट शी तुलना करून सदर योजनेची त्यांनी रूपये १०७,०४,६१,५७९/- इतकी किंमत काढलेली असून कमीचे निविदाकार यांनी वाटाघाटी अंती दर कमी करून निविदा रकमे पेक्षा ६५.२५% जादाचे दरात काम करण्यांस तयार असलेबाबत लेखी कळविलेले आहे.सदरचे आलेले दर व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची किंमत पहाता प्राप्त निविदा ८.४३% जादाचा येत आहे.तसेच महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागामार्फत केलेल्या मुल्यांकानाच्या रकमेशी तुलना करता ९.९१% इतकी जादा दराची येत आहे.

मा.श्री. लोंढे शि.बा. :- निविदा धारकाशी वाटाघाटी करणे कामी कोणती कमेटी नेमली होती.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- कमेटी नेमणेत आलेली नव्हती मा.आयुक्त साहेब यांचे दालनात बैठक घेण्यांत आली होती.

मा.श्री.लोंढे शि.बा. :- सदर निविदे संदर्भात आलेले निविदा दर व सन २००७-२००८ व २००९-२००१० चे डी.एस. आर. रेट या मधील तुलनात्मक दराचा फरक, त्यांचा अभ्यास करणेसाठी सदर सन २००७-२००८ व २००९-२०१०चे डी.एस.आर.रेट च्या प्रती आम्हास देण्यात याव्यात. सदरचे रेट कुठे आणि असे वाढले याचे स्पष्टीकरण देण्यांत यावे. नियमानुसार व जनतेच्या हितासाठी सदर निविदेतील तीन ही निविदा धारकांना निगोशिएशन करिता बोलावणे गरजेचे होते.त्यामुळे चांगली स्पर्धा होवुन सदर योजनेवर घेणारा खर्च वाचू शकतो त्या करिता उर्वरित ठेकेदार यांना स्थायी समिती समोर निगोशिएशन साठी त्वरीत पाचारण करावे महानगरपालिकेचे आर्थिक हित पहावे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- सभापती साहेब हा अहमदनगर शहराचे पाणी पुरवठया संबंधी महत्वाचा विषय आहे. तो आगामी पन्नास वर्षीचे काळातील अहमदनगर शहराचे पाणी पुरवठा बळकट करणारा आहे. महानगरपालिकेचे अधिकारी , कर्मचारी यांनी महतप्रयासाने हा प्रस्ताव सभे पुढे मंजूरीसाठी सादर केलेला आहे. मा. सदस्य श्री. लोंढे शि.बा. यांचे मागणी प्रमाणे त्यांना आवश्यक त्या सर्व कागद पत्रांच्या प्रती उपलब्ध करून घ्याव्यात. या प्रकरणी कोणतीही लपवा लपवी नसून या कामासाठी आपणांस ३० कोटी रूपयाचा निधी प्राप्त झालेला आहे. त्यानुसार कामे तातडीने होणे आवश्यक आहेत. मा.स्थायी समिती सदस्य श्री. लोंढे साहेब यांनी तीनही निविदा धारकांना निगोएिशन करिता बोलावणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. परंतु कायदयातील तरतुदीनुसार प्राप्त निविदा धारकापैकी कमीचे निविदा धारकास प्रथम निगोशिएशन करिता बोलावण्यांत येते त्यांनी दर कमी करण्यांस नकार दिला तरच दुस-या कमीचे निविदा धारकास बोलावण्यांत येते आपण चालू दरसुची नुसार जास्तीत जास्त दहा टक्के पर्यतचे जादाचे दर मंजूर करू शकतो या प्रकरणामध्ये प्राईज एस्क्युलेशन ची अट नसल्याने आगामी काळात भाव वाढ झाली तरी ठेकेदारास दरवाढ देण्यात येणार नाही. तीन वर्षामध्ये हे काम पूर्ण होणे आवश्यक आहे. मा. सभेस विनंती आहे की आपण सदर प्रकरणी सविस्तर चर्चा करून निर्णय घ्यावा.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- आलेले कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- या योजने अंतर्गत कामे कशी होणार आहेत. कामा संबंधी नकाशे, डेमो, दाखविण्यांत यावा.

मा.श्री. पवार बा.रे. **व** मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- या योजने अंतर्गत होणारी कामे व पाईप लाईनची कामे कशा प्रकारे होणार आहेत याची माहिती द्यावी.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- सदर योजने मध्ये मुळा नगर पंप हाउस येथील ५६० अश्वशक्तीचे एक व २०० अश्वशक्तीचे दोन पंपा ऐवजी ८२५ अश्वशक्तीचे एक व ४२५ अश्वशक्तीचे दोन या प्रमाणे पंप बसविणे तसेच विळद पंप हाउस येथे ६५० अश्वशक्तीचे व २५० अश्वशक्तीचे प्रत्येकी तीन पंप बसविणे तसेच पॅनल बोर्ड कॅपॅसिटर बदलणेत येणार असुन विळद ते वसंत टेकडी पर्यत अंदाजे ५ कि.मी. लांबीची नविन ६०० एम.एम. व्यासाची डी.आय. पाईप लाईन टाकणे वसंत टेकडी येथे उंच साठवण टाकी व अस्तित्वातील वितरण व्यवस्थेतील पाण्याचे टाक्यासह नागापूर,निर्मलनगर, महनगरपालिका नविन कार्यालयाचे मागे,शांतीनगर, भिस्तबाग, नगर-कल्याण रोड शिवाजीनगर येथे पाण्याच्या नविन टाक्या बांधणे वसंत टेकडी येथून शहरातील पाण्याच्या टाक्या भरण्यासाठी ७०० एम.एम. ते २०० एम.एम. व्यासाची डी.आय. पाईप लाईन टाकणे. महानगरपालिका हद्दीतील संपूर्ण भागात १०० ते ६०० एम.एम. व्यासाचे के-७ डी.आय. पाईप द्वारे सुमारे ३५० कि.मी. लांबीची संपूर्ण नविन वितरण व्यवस्था करणे आहे. तसेच संपूर्ण योजना कार्यान्वयीत झाले नंतर संपूर्ण योजनेचे संगणकीय पध्दतीने नियंत्रण Scada सिस्टीमद्वारे करणे इत्यादी कामे होणार आहेत.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- सदरचे प्रस्ताव मंजूरीस माझा विरोध आहे. प्रस्ताव मंजूरीस माझा विरोध नोंदवावा.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- मंजूर ठेकेदार यांनी इतर ठेकेदाराकडून काम करून घेतले तर.......

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- तशी तरतुद नाही. त्यामुळे इतर ठेकेदाराकडून कामे करून घेतली जातील किंवा कसे याबाबत निश्चित सांगता येणार नाही.

मा.श्री. गव्हाळे वि. ना. :- आलेले कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार आलेले कमीचे निविदा दरास मंजूरी देण्यांत यावी. मा.सदस्य श्री. लोंढे शि.बा. यांचा ठराव मंजूरीस विरोध नोंदवावा ठराव बहुमताने मंजूर करावा.

**ठराव :-** मा.केंद्र शासीत यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ राबविणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता, ऑफिस रिपोर्ट व या योजनेचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. स्ट्रॅडकॉम कन्सलटंट, पुणे यांनी केलेली शिफारस इ. बाबींचा विचार करता स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट लि. मुंबई यांनी दुस-या वाटाघाटी नंतर कमी करून दिलेल्या अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ६५.२५%(पासष्ठ पूर्णांक पंचवीस शतांश टक्के) जादाचे म्हणजेच निविदा रक्कम रूपये ११६,०७,४१,९७०/-(रूपये एक अब्ज सोळा कोटी सात लाख एक्केचाळीस हजार नउत्रशे सत्तर फक्त) चे दरास बहुमताने मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच नामंजूर निविदा धारक यांची टेंडर बयाना रिफंड करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. स्थायी समिती सदस्य,मा.श्री. लोंढे शिवाजी बाळासाहेब यांचा विरोध वगळता सदर प्रस्तावास खर्चासह बहुमताने मंजुरी देणेत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ.

ठराव बहुमताने मंजूर.

सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१**

विषय क्रमांक-३ बुधवार दिनांक २१/०४/२०१०

ठराव क्रमांक -३ बुधवार दिनांक २१/०४/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचा जलतरण तलाव ५वर्ष कालावधीसाठी चालविण्यांस देणे व त्या काळात जलतरण तलावाची देखभाल व दुरूस्ती पहाणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-**अ.नगर म.न.पा. पाणी पुरवठा विभाग / दि.२६/०३/२०१०

विषय :- महानगरपालिका मालकीचा जलतरण तलाव ५ वर्षे भाडेपट्टयावर चालविणेस देणेकामी मागविण्यात आलेल्या निविदाचा तुलनात्मक तक्ता.

मा.सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर की, वरील कामी दि.११/२/२०१० रोजीचे दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात जाहीर निविदा मागविल्या असता वेळेत व मुदतीत खालीलप्रमाणे ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

१] अहमदनगर जिल्हा माजी सैनिक संघ, अहमदनगर
२] नॅशनल एक्स सर्हिसमन सिक्यु. गार्ड , अ.नगर
३] नवभारतीय सुशिक्षीत बेरोजगार संघ, अ.नगर

वरील वेळेत व मुदतीत प्राप्त निविदा दि.१७/०३/२०१० रोजी दुपारी १२.३० वाजता मा.उपायुक्त (सा.) यांचे समक्ष व निविदा धारक प्रतिनिधी यांचे समक्ष उघडल्या असता त्याचा दराचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे

| अ.क्र | विषय | नॅशनल एक्सटिकेन सिक्यु. गार्ड | अहमदनगर जिल्हा माजी सैनिक संघ | नवभारतीय सुशिक्षीत बेरोजगार संघ |
|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर महानगरपालिका जलतरण तलाव ५ वर्षे मासिक भाडेपट्टयावर चालविण्यास देणे व त्या कालावधीत जलतरण तलावाचे देखभाल दुरूस्ती पाहणे. | मासीक भाडे दरमहा १४,०००/- | मासीक भाडे दरमहा १०,०००/- | मासीक भाडे दरमहा १०,५००/- |

तरी वरील प्राप्त दरांमध्ये नॅशनल एक्स सर्व्हिसमन सिक्युरिटी गार्ड, अहमदनगर यांचे दर सर्वात जास्तीचे प्राप्त झालेले असून दर स्विकारण्यास हरकत नाही. तथापी धोरणात्मक बाब असल्याने मा. स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर करणे योग्य आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता श्री. व्ही.जी. सोनटक्के यांचा अहवाल असे. दि. २६/३/१०

उपअभियंता (पा.पु.) :- अहवालानुसार मान्यतेस्तव सादर दि.२६/३/१०

पाणी पुरवठा विभाग प्रमुख :- अहवालानुसार मा.स्थायी समिती च्या निर्णयास्तव सादर करणे योग्य मान्यतेस्तव सादर. दि२६/३/१०

मुख्य लेखा परिक्षक :- रजेवर
मुख्य लेखा अधिकारी :- मा.स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर करणे योग्य दि.२६/३/१०
मा.उपायुक्त (सा.)साहेब :- मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठविणे करिता मान्यतेस्तव सादर. दि.२९/३/१०
मा. आयुक्त साहेब :- वाटाघाटीस बोलवा. दि.३०/३/१०

--**--

मा. फेरसादर,

दि. १/४/२०१० रोजी मा. आयुक्त महादेयांच्या दालनात मा.उपायुक्त (सा.)पाणी पुरवठा विभाग प्रमुख व श्री.वाबळे,नॅशनल एक्स सर्व्हिसमन सिक्युरिटी गार्ड यांचेत वाटाघाटी संदर्भात चर्चा झाली.

सदर चर्चेच्या वेळी नॅशनल एक्स सर्व्हिसमन रिक्युरिटी गार्ड यांनी निविदेत भरलेले भाडे प्रतिमाह रू.१४,०००/- ऐवजी रू.१६,०००/- प्रतिमाह करित असल्याबाबत मान्य केले. तसेच पुढील वर्षापासून दरवर्षी १०% भाडे वाढ करित असल्याचेही मान्य केले.

तरी नॅशनल एक्स मन सिक्युरिटी गार्ड, अहमदनगर यांचे वाटाघाटीनंतरचे दर म्हणजेच रू.१६,०००/- प्रतिमाह भाडे व पुढील वर्षापासून १०% भाडयात वाढ हे दर स्विकारण्यास हरकत नाही.

तथापी धोरणात्मक बाब असल्याने मा.स्थायी समितीच्या मंजूरीसाठी सादर करणे योग्य आदेशार्थ सादर. **/अ**

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे. दि.३/४/१०

अंतर्गत लेखा परिक्षक :- पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे प्रस्तावाप्रमाणे मा.स्थायी समितीच्या मंजुरीसाठी ठेवणेस मान्यता देणेस हरकत नाही.
मुख्य लेखा अधिकारी :- **"अ"** प्रस्तावानुसार मा.स्थायी समिती समोर ठेवणे योग्य. /**अ**
मा.उपायुक्त (सा.) साहेब :- **"अ"** नुसार मान्यतेस्तव सादर. दि.०६/४/१०
मा.आयुक्त साहेब :- **" अ"** मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचा जलतरण तलाव पाच वर्ष कालावधीसाठी भाडे पट्टयाने चालविण्यांस देणे कामी आलेल्या जादाचे निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.
मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- मॅके. इंजि. यांनी प्रस्तावाची माहिती सांगावी.
मॅके.इंजि.श्री. निकम पी.जे.:-अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचा जलतरण तलाव ५ वर्ष कालावधीसाठी चालविण्यांस देणे व त्या काळात जलतरण तलावाची देखभाल व दुरूस्ती पहाणे कामी दिनांक ११/२/२०१० रोजीचे दैनिक लोकमत या वर्तमान पत्रात जाहिर निविदा मागविल्या असता वेळेत व मुदतीत अहमदनगर जिल्हा माजी सैनिक संघ, अहमदनगर, नॅशनल एक्स सर्व्हिसमन सिक्युरिटी गार्ड, अहमदनगर व नवभारत सुशिक्षीत बेरोजगार संघ, अहमदनगर अशा तीन निविदा प्राप्त झाल्या. जास्तीचे निविदा धारक नॅशनल एक्स सर्व्हिसमन

सिक्युरिटी गार्ड, अहमदनगर यांचे रूपये १४०००/- दरमहा मासिक भाडे या प्रमाणे जास्तीचे दर प्राप्त झाले.जास्तीचे निविदादर धारक यांना वाटाघाटीसाठी बोलावले असता त्यांनी वाटाघाटी अंती रूपये १६,०००/- दरमहा भाडे व पुढील वर्षापासून १०% भाडयात वाढ याप्रमाणे दर मान्य केले. जास्तीचे निविदा दर धारक नॅशनल एक्स सर्व्हिसमन सिक्युरिटी गार्ड, यांचे दरास मंजूरी मिळणे करिता प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यांस मा. सभेने मंजूरी द्यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार जादाचे निविदा दर धारक नॅशनल एक्स सर्व्हिसमन सिक्युरिटी गार्ड यांनी वाटाघाटी अंती वाढवून दिलेले जादाचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी. ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**ठराव** :-अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचा जलतरण तलाव ५वर्ष कालावधीसाठी चालविण्यांस देणे व त्या काळात जलतरण तलावाची देखभाल व दुरूस्ती पहाणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता तुलनात्मक दृष्टया जादाचे निविदा दर धारक नॅशनल एक्स सर्व्हिसमन सिक्युरिटी गार्ड, अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती वाढवून दिलेल्या रूपये १६,०००/-(रूपये सोळा हजार फक्त) प्रमाणे दरमहा भाडे व पुढील वर्षापासून १०% (दहा टक्के) दरमहा भाडयात वाढ या प्रमाणेचे जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर

तसेच नामंजूर निविदा दर धारक यांची टेंडर बयाना रिफंड करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ.

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.